15-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/14/2025 10:08 PM Page 1



## निवडक

### कुजिरा बांबोळी येथे नाट्य कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १४ :** तरुण कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी आणि आवश्यक सर्जनशील कौशल्ये विकसित करण्यासाठी, ध्यास कोकणी यांनी मुलांसाठी नाट्य कार्यशाळा आयोजित केली आहे. तरुण मनांना मजेदार आणि आकर्षक उपक्रमांद्वारे नाट्यसृष्टीचा अनुभव घेण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाला रविवार दि. १८ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० या वेळेत मुष्टिफंड संस्था बिल्डिंग, कुजिरा बांबोळी येथे आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत मुलांना नाटकाच्या मूलभूत गोष्टींची ओळख करून दिली जाईल, ज्यामध्ये शरीराची हालचाल, कथाकथन आणि सादरीकरण यावर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. गतिमान व्यायाम आणि मार्गदर्शित सत्रांद्वारे सहभागी भावना कशा व्यक्त करायाच्या, पत्रांची निर्मिती कशी करायची आणि एक संघ म्हणून काम कसे करायचे हे शिकतील. कार्यशाळेत मार्गदर्शन सहाय्यक प्राध्यपक आणि नाट्य कलाकार डॉ. तन्वी कामत बांबोळकर करतील, ज्यांना खेळकर वातावरण तरुण प्रतिभेचे संगोपन करण्याची आवड आहे. अधिक माहितीसाठी आणि नोंदणी करण्यासाटी सनत भरणे यांच्याकडे संपर्क साधावा.

### शिरोडा यूथ क्लबचा अंतिम फेरीत प्रवेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** आर्लेम यूथ असोसिएशनने आयोजित केलेल्या ३३व्या आर्लेम चषक आंतरग्रम फुटबॉल स्पर्धेत शिरोडा यूथ क्लबने अंतिम फेरीत प्रवेश मिळविला आहे.

राय पंचायत मैदानावर खेळविण्यात आलेल्या स्पर्धेतील उपांत्य लढतीत शिरोडा यूथ क्लबने असोल्डेच्या सेंट अँथनी स्पोर्ट्स क्लबचा २-१ असा पराभल केला. शिरोडा यूथ क्लबच्या डॅनल क्रूज व दादापीर पाटील यांनी गोल केले. तर पराभूत सेंट अँथनी स्पोर्ट्स क्लबचा एकमेव गोल सनी फर्नांडिसने केला. या सामन्यात सामनावीराचा परस्कार अथर्व घाडीला देण्यात आला.

### मनपातर्फे महिला - मुलांच्या सुरक्षा मोहिमेला प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** महानगरपालिकेने गोवा पोलिस आणि स्कॅन – गोवा या स्वयंसेवी संस्थेच्या साहाय्याने 'सेफ्टी फर्स्ट : एम्पॉवरिंग विमेन अँड प्रोटेक्शनिंग चिल्ड्रन' मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. समाजातील महिला आणि मुलांची सुरक्षितता वाढवणे हे या मोहिमेचा मुख्य उद्देश आणि तसेच या मोहिमेच्या माध्यमातून महिला, मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी लोकांना शिक्षित करणे, सक्षम करणे यासारख्या गोष्टी करण्यात येणार आहे.

या मोहिमेंतर्गत संपूर्ण शहरात आणि स्थानिक बसेसमध्ये आकर्षक होर्डिंग्ज आणि स्टिकर्स लावले जाणार आहेत. जेणेकरून जागरूकता निर्माण होईल आणि सुरक्षिततेच्या साधनांबद्दल माहिती मिळेल. पोलिसांच्या सहाकार्याने राजधानीतील बसेसची नियमित तपासणी केली जाईल आणि महिला आणि बाल प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी साध्या वेशातील पोलिस अधिकारी बसेसमध्ये प्रवास करतील. विविध लोकांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने या मोहिमेत सर्व वयोगटातील लोकांना आकर्षित करणारे आकर्षक डिझाईन आणि संदेश वापरले आहेत. होर्डिंग्ज मुख्य ठिकाणी लावण्यात येणार आहे, तर स्टिकर्स समुदाय केंद्र, शाळा आणि स्थानिक व्यावसायिकांमध्ये वितरित केले जातील. या मोहिमेंतर्गत वेळोवेळी लहान – मोठे कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात येणार आहे.

### जुने गोवे येथे १८ रोजी नृत्य स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १४ :** वडेश्वर महादेव देवस्थान जुने गोवेच्या द्वितीय वर्धापननिमित्त रविवारी दि. १८ रोजी रात्री ८ वाजता अखिल गोवा नत्य स्पर्धा १२ वर्षे व त्याखालील तसेच १२ वर्षांवरील अशा दोन गटांतील स्पर्धकांसाठी खुली असेल. दोन्ही गटांतील विजेत्यांना प्रत्येकी तीन विजेत्यांसह उत्तेजनार्थ आकर्षक बक्षिसे देण्यात येतील. अधिक माहिती व नावनोंदणीसाठी दि. १७ रोजी पूर्वी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांतर्फे कळविण्यात आले आहे.

# 'माझी बस' योजना उद्यापासून बंद

**खाजगी बस चालकांच्या दबावामुळे सरकारचा निर्णय | एक नवीन सुधारित योजना आणणार**

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १४ :** ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने प्रायोगिक तत्वावर सुरू केलेली महत्त्वाकांक्षी 'माझी बस' योजना येत्या १६ मेपासून बंद होणार आहे. खाजगी बस चालकांच्या दबावामुळे सरकारने हा निर्णय घेतला असून, आता त्यांच्या फायद्यासाठी एक नवीन सुधारित योजना आणली जाणार असल्याचे कदंब ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन लिमिटेडचे अध्यक्ष उल्हास तुयेकर यांनी स्पष्ट केले.

ऑगस्ट २०२३ मध्ये सुरू झालेल्या 'माझी बस' योजनेत, दक्षिण गोव्यातील काणकोण, केपे व इतर दुर्गम भागांमध्ये एकूण ५७ बसेस चालवल्या जात होत्या. संध्याकाळच्या वेळेतही सेवा पुरवली जात होती, ज्यामुळे सार्वजनिक वाहतूक सुविधांचा लाभ ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात झाला होता. १६ मेपासून म्हजी बस योजना थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याऐवजी खाजगी बस ऑपरेटर्सना केंद्रस्थानी ठेवून एक सुधारित योजना लवकरच सादर केली जाणार असल्याचे तुयेकर यांनी म्हटले आहे

योजनेच्या चाचणी कालावधीत ऑगस्ट २०२३ ते एप्रिल २०२५ मध्ये कदंब महामंडळाने ११.१० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले. मात्र, या कालावधीत झालेल्या खर्चाची तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारने ११.६६ कोटी रुपयांचे अनुदान दिले. एवढेच नव्हे, तर २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात योजनेचा विस्तार करण्यासाठी ८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

नवीन योजनेअंतर्गत, खाजगी बस चालकांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रति किलोमीटर ३ रुपये इंधन अनुदान, तसेच वाहन विम्याच्या खर्चात ५० टक्के भागीदारी राज्य सरकार करणार आहे. त्याचप्रमाणे, १५ वर्षांहून अधिक जुन्या बस रद्द करणे बंधनकारक असून, नवीन बस खरेदीसाठी १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळेल.

खाजगी बस ऑपरेटर्सनी कदंब महामंडळासोबत केलेल्या करारानुसार त्यांना प्रति किमी सरासरी ३४ रुपये दिले जातात. त्यात चालक आणि कंडक्टरचा खर्च समाविष्ट असतो. उर्वरित रक्कम अनुदानाच्या स्वरूपात दिली जाते.

खाजगी बस ऑपरेटर्सनी 'माझी बस' योजनेला सुरुवातीपासूनच विरोध दर्शवला होता. त्यांनी दावा केला आहे की, २०१८ पासून प्रलंबित असलेल्या सुमारे ३६ कोटी रुपयांच्या इंधन अनुदानाची थकबाकी अद्याप देण्यात आलेली नाही.

## गोव्यात ३०० बेकायदेशीर दारू व्यापारी कार्यरत ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** गोव्याच्या किनारपट्टी भागात सुमारे ३०० बेकायदेशीर दारू विक्रेत्यांकडून दारू विक्री सुरू असल्याचा आरोप ऑल गोवा लिकर ट्रेडर्स असोसिएशन (एजीएलटीए)ने केला असून, या व्यापाऱ्यांविरोधात तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना एजीएलटीएचे अध्यक्ष दत्तप्रसाद नाईक यांनी सांगितले की, गेल्या पाच-सहा वर्षांपासून गोव्यात हरियाणातून मोठ्या प्रमाणावर दारू आणली जात आहे. हरियाणामधील दारूचे दर तुलनेत कमी असल्याने तिथून मोठा साठा गोव्यात पाठवला जातो. अनेक हरियाणावासी येथे भाडेतत्त्वावर दुकाने चालवत आहेत आणि त्यांच्या राज्यातून दारू आणून विक्री करत आहेत. आम्ही हे वारंवार उत्पादन शुल्क विभागाच्या निदर्शनास आणून दिले आहे, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

पत्रादेवी चेकपोस्टवर अलीकडेच २ कोटी रुपयांहून अधिक किमतीची दारू जप्त करण्यात आली होती. त्या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही संघटनेने केली. या साठ्यामागील मुख्य सूत्रधारांची ओळख पटवून त्यांना अटक करावी. आम्ही गोव्यात बाहेरून आलेल्या अशा बेकायदेशीर व्यापाऱ्यांची यादी लवकरच प्रसिद्ध करू. आम्ही वारंवार सांगत आहोत की, राज्यात एक पारदर्शक आणि कायदेशीर दारू व्यापार हवा आहे,असे नाईक म्हणाले.

दरम्यान, आम आदमी पक्षाचे (आप) गोवा प्रदेशाध्यक्ष अॅड. अमित पालेकर यांनी देखील यासंदर्भात गंभीर आरोप करत, सत्ताधारी पक्षातील एका पदाधिकाऱ्याच्या सहभागाचा आरोप केला आहे. पक्ष कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना अॅड. पालेकर म्हणाले की , हरियाणाहून गोव्यात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर दारू आयात केली जात आहे, तसेच गोव्यातून इतर राज्यांमध्ये दारूचा बेकायदेशीर निर्यात होत आहे. यामुळे राज्य सरकारला कोट्यवधी रुपयांचे महसूल नुकसान होत आहे.

काही दिवसांपूर्वी, बेकायदेशीर दारू वाहतुकीत वापरल्या जाणाऱ्या एका ट्रकला अडवले गेले होते. मात्र, त्या कारवाईत सहभागी असलेल्या उत्पादन शुल्क निरीक्षक देव राऊत यांची बदली करण्यात आली, जी अत्यंत निषेधार्ह आहे,असा आरोप पालेकर यांनी केला.

दारू भरलेला ट्रक हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरून गोव्यात पोहोचतो, ही गोष्ट दुर्लक्षण्यासारखी नाही. या घोटाळ्याच्या मुळाशी सत्ताधारी पक्षाशी संबंधित काही व्यक्ती आहेत. अंमलबजावणी संचालनालय (ईडी) ने याची सखोल चौकशी करावी. हा घोटाळा दिसतो त्यापेक्षा मोठा आहे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी करत पालेकर म्हणाले की, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी हरियाणाहून होणाऱ्या बेकायदेशीर आयात, गोव्याहून होणारी तस्करी आणि राज्याच्या महसुलावर होणारे परिणाम याची तातडीने उच्चस्तरीय चौकशी सुरू करावी. या प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे.

## वेर्णा कोमुनिदाद निवडणुका बेकायदेशीर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** वेर्णा कोमुनिदादच्या व्यवस्थापकीय समितीच्या निवडणुका बेकायदेशीर ठरवत प्रशासकीय न्यायाधिकरणाने अध्यक्षपदासाठी निवडणूक प्रक्रिया रद्द केली आहे. कोमुनिदादच्या संहितेनुसार अनिवार्य असलेल्या खुल्या मतदान प्रक्रियेला डावलण्यात आल्याने निवडणुका अवैध ठरवल्याचे निरीक्षण न्यायाधिकरणाने नोंदवले.

**▶ प्रशासकीय न्यायाधिकरणाचा निर्णय**

न्यायाधिकरणाचे अध्यक्ष पाटकर यांनी दिलेल्या निकालात, अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभूत झालेल्या अॅड. सॅव्हियो जे. एफ. कोरिया यांनी दाखल केलेले अपील कायम ठेवण्यात आले. न्यायाधिकरणाने स्पष्ट केले की, अध्यक्षपदासाठी मतदान करताना अधिकाऱ्यांनी मतपत्रिका क्रमांकाऐवजी याच्छिक पद्धतीने वाटल्याने संपूर्ण मतदान प्रक्रियेवर संशय निर्माण झाला. यामुळे कोमुनिदादच्या मूळ संहितेनुसार आवश्यक असलेल्या एस्क्रुटिनियो अबर्टो म्हणजेच खुल्या आणि पारदर्शक मतदान प्रक्रियेला फाटा देण्यात आला. परिणामी, निवडणूक गुप्त पद्धतीने झाल्याचा आभास निर्माण झाला.खुल्या मतदानाच्या सक्तीची अट ही निवडणुकीच्या प्रक्रियेचे मर्म असून, तिचे उल्लंघन ही संपूर्ण निवडणूकच अवैध ठरवते, असे न्यायाधिकरणाने स्पष्टपणे नमूद केले.

न्यायाधिकरणाने निवडणुकीच्या इतिवृत्तांवर टीका करत म्हटले की, खुल्या मतपत्रिका जारी करण्यात आल्या,असे नमूद असले तरी मतमोजणी आणि पडताळणीची कोणतीही नोंद त्यामध्ये नव्हती. ही प्रक्रिया डिकरपाल , दवरली आणि मडगाव कोमुनिदादच्या पारदर्शक पद्धतींशी विसंगत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

निवडणुकीसाठी नोंदणीकृत ११३ सदस्यांना मतपत्रिका देण्यात आल्या होत्या. मात्र प्रत्यक्ष मतमोजणीत फक्त ११२ मतेच मोजली गेली, अशी बाब न्यायाधिकरणाने अधोरेखित केली. एका मतपत्रिकेचे काय झाले याचा तपशील उपलब्ध नाही. संबंधित सदस्याने मत दिले की नाही, याचीही नोंद नाही, असे निकालात नमूद करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा हवाला देत, न्यायाधिकरणाने म्हटले की, जेव्हा कायदे विशिष्ट प्रक्रिया निर्धारित करतात, तेव्हा ती प्रक्रिया काटेकोरपणे पाळलीच पाहिजे. त्यामुळे,कोमुनिदादच्या संहितेनुसार व्यवस्थापकीय समितीवरील सर्व पदांसाठी (वकील वगळता) नव्याने निवडणुका घेण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

## २४ तास पाणीपुरवठा प्रकल्पाला केंद्र सरकार अनुकूल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** गोव्यातील घराघरांमध्ये २४ तास पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'ड्रिंक फ्रॉम टॅप' योजनेला केंद्र सरकारकडून सैद्धांतिक मंजुरी मिळाली आहे. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी या योजनेसाठी गोवा सरकारने मागितलेल्या ३२६.३० कोटी रुपयांच्या विशेष निधीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे.

सोमवारी गोवा दौऱ्यावर असलेल्या खट्टर यांनी राज्यातील विविध नागरी विकास योजनांचा आढावा घेतला. यामध्ये अमृत आणि अमृत २.०, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), स्मार्ट सिटी मिशन, स्वच्छ भारत मिशन (शहरी), दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान आणि पीएम स्वनिधी यांचा समावेश होता.

या बैठकीदरम्यान मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी खट्टर यांच्याकडे ड्रिंक फ्रॉम टॅप योजनेसाठी विशेष निधीची मागणी केली. या प्रकल्पांतर्गत जलस्रोत वाढवणे, पायाभूत सुविधांचे सशक्तीकरण, विद्यमान जलवाहिन्यांचे पुनर्विकसन, स्मार्ट मीटर बसविणे, तसेच आयओटी आणि एससीएडीए प्रणालीच्या आधारे जल व्यवस्थापन करणे प्रस्तावित आहे. राज्य सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्रीय मंत्र्यांनी गोव्याच्या विशेष निधीच्या मागणीवर विचार करण्याची सहमती दर्शवली आहे.

मुख्यमंत्री सावंत यांनी गोव्यातील पर्यटनवाढीमुळे शहरी पायाभूत सुविधांवर वाढणारा ताण लक्षात घेता अमृत २.० आणि स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राज्याला अधिक वित्तीय सहाय्य आणि वेगवान मंजुरी मिळावी, यासाठी विशेष बाब म्हणून विचार करण्याची विनंती केली. यावर प्रतिसाद देताना, पर्यटनप्रधान राज्यांसाठी धोरणात्मक बदल आवश्यक असून, याबाबत अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश देण्यात आले आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बैठकीत खट्टर यांनी शाश्वत शहरी विकासासाठी धोरणात्मक नियोजन, सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा वापर, आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर भर दिला. त्यांनी अमृत योजनेंतर्गत प्रलंबित पाणीपुरवठा व सांडपाणी निचरा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचा सल्ला दिला.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय निर्मिती (सामुदायिक, सार्वजनिक, आकांक्षायुक्त) आणि घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांबाबत तात्काळ निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत परवडणाऱ्या घरे मिळवण्यासाठी नागरिकांना माहिती व मार्गदर्शन देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. याशिवाय, त्यांनी गोवा सरकारला पीएम-ईबस सेवा योजनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आणि स्मार्ट सिटी तसेच दीनदयाळ अंत्योदय योजनांमधील प्रगतीचा आढावा घेतला.

## कॅप्टन ऑफ पोर्ट्स विभागाचे बोट मालकांना कडक निर्देश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** पावसाळ्याच्या प्रारंभासह राज्यात मलेरिया, डेंग्यू व चिकुनगुनियासारख्या वेक्टरजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कॅप्टन ऑफ पोर्ट्स विभागाने गोव्यातील सर्व सागरी वाहतूक व जलक्रीडा क्षेत्रातील संबंधितांना कडक सूचना जारी केल्या आहेत.

या सूचनेत सर्व बार्ज मालक, कॅनो ऑपरेटर, जलक्रीडा सेवा पुरवठादार, जहाज दुरुस्ती यार्ड संचालक, डॉकयार्ड व्यवस्थापक यांचा समावेश आहे. पावसामुळे निर्माण होणाऱ्या साचलेल्या पाण्यात डासांच्या उत्पत्तीची शक्यता लक्षात घेता, अशा पाण्याची तत्काळ विल्हेवाट लावण्यावर विभागाने विशेष भर दिला आहे. बार्ज व अंतर्गत जलवाहतूक करणाऱ्या जहाजांच्या मालकांना कार्गो होल्डमध्ये पाणी साचू नये यासाठी विशेष काळजी घेण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, फेंडर म्हणून वापरल्या जाणाऱ्या टायर्समध्ये पाणी साचू नये म्हणून त्यात ड्रेनेजसाठी छिद्र पाडण्यास सुचविण्यात आले आहे.

कॅनो व इतर लहान बोटींच्या चालकांना त्यांच्या बोटी पावसात वापरात नसताना उलट ठेवण्याची किंवा ताडपत्रीने झाकण्याची सूचना देण्यात आली आहे, जेणेकरून पाणी साचण्याची शक्यता कमी होईल. साचलेले पाणी वेळेत काढून टाकणे अत्यावश्यक असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

या उपायांव्यतिरिक्त, ट्रॉलर, जेटी, गोदी, शिपयार्ड व दुरुस्ती केंद्रांमध्ये कार्यरत कामगारांची मलेरियासाठी नियमित वैद्यकीय तपासणी करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी संबंधितांनी आरोग्य संचालनालयाकडून आरोग्य कार्ड मिळवणे आवश्यक आहे, असे निर्देश देण्यात आले आहेत. गोदी व शिपयार्ड व्यवस्थापकांनी त्यांच्या अखत्यारीतील परिसरात पावसाचे पाणी साचू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

कॅप्टन ऑफ पोर्ट्स विभागाने सर्व संबंधित भागधारकांना , बार्जेस, प्रवासी फेऱ्या, पर्यटक बोटी, क्रूझ जहाजे, मासेमारी ट्रॉलर तसेच इतर यांत्रिक व गैर-यांत्रिक जलवाहतूक साधनांच्या चालकांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. सूचनांकडे दुर्लक्ष केल्यास त्यावर गंभीरपणे विचार केला जाईल आणि आवश्यक ती कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही विभागाने दिला आहे.

# भाजप मंत्र्यावर एफआयआर नोंदवण्याचे उच्च न्यायालयाचे कडक आदेश

**मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविषयी केले वादग्रस्त विधान**







**इंदूर (वृतसंस्था), दि. १४ :**

मध्य प्रदेशचे आदिवासी विकास मंत्री विजय शाह यांनी १२ मे रोजी एका सार्वजनिक कार्यक्रमात भारतीय लष्करातील पहिल्या महिला पायदळ अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविषयी केलेले वादग्रस्त विधान उच्च न्यायालयाच्या लक्षात आले आणि त्यावर न्यायालयाने स्वत:हून तात्काळ दखल घेतली. उच्च न्यायालयाने राज्याच्या पोलिस महासंचालक यांना विजय शाह यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले असून, या प्रकरणी त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अतुल श्रीधरन आणि न्यायमूर्ती अनुराधा शुक्ला यांच्या खंडपीठाने बुधवारी दिलेल्या आदेशात स्पष्ट केले की, मंत्री विजय शाह यांचे विधान जातीयतेला खतपाणी घालणारे असून ते सामाजिक सौहार्द बिघडवणारे आहे. न्यायालयाने राज्य सरकारकडून या प्रकरणी तत्काळ कारवाई करण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर काँग्रेस पक्षाने मंत्री विजय शाह यांच्या विधानाचा विरोध केला आहे आणि त्यांना पक्षातून निलंबित करण्याची मागणी केली आहे. काँग्रेसचे नेते अरुण यादव यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करत म्हटले की, सरकारने मंत्री विजय शाह यांच्याविरुद्ध तात्काळ एफआयआर दाखल करावा आणि त्यांना पक्षातून काढून टाकावे. उच्च न्यायालयाने मंत्री शाह यांच्या विधानाला भारतीय लष्कराचे, विशेषतः कर्नल सोफिया कुरेशी यांचे अपमान करणारे ठरवले आहे.

सार्वजनिक कार्यक्रमामध्ये मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. इंदूर जिल्ह्यातील महू तालुक्यातील रायकुंडा गावात आयोजित एका कार्यक्रमात मंत्री शाह यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदींनी आपल्या समुदायातील एका बहिणीला दहशतवाद्यांवर कारवाई करण्यासाठी पाठवले आहे. याच वक्तव्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यात शाह कर्नल सोफिया कुरेशी यांना दहशतवाद्यांची बहीण अशी उपमा देताना दिसत होते.

मंत्री शाह यांच्या या विधानामुळे समाजमाध्यमांवर मोठा वाद उभा राहिला. विरोधकांनी त्यांच्यावर टीका केली आणि त्यांच्या विधानाला अस्वीकार्य ठरवले. काँग्रेस नेत्यांनी या विधानावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली असून, भाजपकडून मंत्री विजय शाह यांना तात्काळ पक्षातून निलंबित करण्याची मागणी केली आहे. विरोधी पक्ष आणि अनेक सामाजिक संघटनांनी मंत्री विजय शाह यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते अरुण यादव यांनी ट्विट करून म्हटले की , मंत्री विजय शाह यांचे विधान असंवेदनशील, अस्वीकार्य आणि चिथावणीखोर आहे. कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविषयी केलेले विधान भारतीय लष्कराची आणि कर्नल कुरेशी यांची अवहेलना आहे. काँग्रेसने हे विधान भारतीय सैन्याच्या शौर्याचे आणि कर्नल सोफिया कुरेशी यांचे कर्तव्यपालन यांचे अपमान करणारे ठरवले आहे.

सर्वसामान्य नागरिकांमध्येही मंत्री शाह यांच्या विधानामुळे असंतोष पसरला आहे. अनेक नेत्यांनी या विधानाला जातीयतेला खतपाणी देणारे आणि अशा प्रकारच्या भाषणामुळे समाजात दंगे भडकवण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे. राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता प्रशांत सिंह यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही उच्च न्यायालयाच्या लेखी आदेशाची प्रतीक्षा करत आहोत. एकदा आदेश प्राप्त झाल्यानंतरच आम्ही या प्रकरणी पुढे काय करायचे हे ठरवू, असे सिंह यांनी म्हटले आहे.

शासनाने या प्रकरणी त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिले असून, न्यायालयाच्या दखल घेण्याची महत्त्वाची कारणे आहेत. मंत्री विजय शाह यांच्या वादग्रस्त वक्तव्याने मध्य प्रदेश सरकारच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एकीकडे ते राष्ट्रीय सुरक्षा आणि सैन्याच्या शौर्याला कमी लेखत आहेत, तर दुसरीकडे त्यांच्या भाषणामुळे सामाजिक सौहार्द बिघडू शकतो अशी भीती व्यक्त केली जात आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये मंत्री शाह यांच्या भाषणाचा भाग समाविष्ट आहे, ज्यात त्यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांचा उल्लेख दहशतवाद्यांची बहीण असा केला आहे. व्हिडिओ प्रचंड प्रमाणात व्हायरल झाला आणि अनेक व्यक्तींनी त्यावर प्रतिक्रिया दिली. विधीशास्त्रज्ञ आणि कायदेतज्ज्ञ यांचे म्हणणे आहे की, मंत्री शाह यांच्या विधानावर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या विधानामुळे देशाच्या सुरक्षा दलांचे आणि सैन्याच्या शौर्याचे अपमान झाल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, राज्य सरकारने या प्रकरणात त्वरित कार्यवाही करणे गरजेचे आहे.